महाराष्ट्र शासन
शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड
मु. शिळ, पो. ओंदे, झडपोली शिळ रोड, ता. विक्रमगड, जि. पालघर - ४०१६०५
ज्ञानं परमं बलम्
वेबसाईड - www. gpvikramgad.ac.in
ईमेल - principal.gpvikramgad@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शातंवि/प्रवेश प्रकिया २०२६-२७ /

दिनांक -

## प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी प्रवेश २०२६–२७
## संस्था स्तरावरील अतिरिक्त प्रवेश फेरी

**संदर्भ : तंशिस/पदविका प्रवेश वेळापत्रक /प्रवेशाचा सुधारित अंतिम दिनांक / २०२६ /४३६ दि. २५/०८/२०२६ नुसार**

**शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मधील प्रथम व थेट द्वितीय वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रीभूत प्रवेश फेरीनंतरच्या संभाव्य रिक्त जागांसाठी संस्था स्तरावरील अतिरिक्त प्रवेश फेरी खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येत आहे.**

| Institute Level First Year Diploma & Direct Second Year Diploma admission Schedule |
|---|
| ◆ ०५/०९/२०२६ – शनिवार<br>◆ ०७/०९/२०२६ – सोमवार<br>◆ ०८/०९/२०२६ – मंगळवार<br>◆ ०९/०९/२०२६ – बुधवार<br>◆ १०/०९/२०२६ – गुरुवार<br>◆ ११/०९/२०२६ – शुक्रवार |

## प्रवेशासाठी पात्र विद्यार्थी

१) ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वीच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभाग घेतला होता, परंतु त्यांना प्रवेश मिळाला नाही असे सर्व विद्यार्थी.

२) ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला आहे, परंतु त्यांना शाखा बदल (Branch Change) करावयाचा आहे असे सर्व विद्यार्थी.

३) प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्ष प्रवेशाकरिता https://poly26.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज निश्चित (Confirmed) केलेले विद्यार्थी पात्र राहतील.

४) थेट द्वितीय वर्ष प्रवेशाकरिता https://dsd26.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज निश्चित (Confirmed) केलेले विद्यार्थी पात्र राहतील.

## प्रत्येक Round च्या दिवशीचे वेळापत्रक

| कार्य | वेळ |
|---|---|
| संस्थेत नाव नोंदणी (Registration) | सकाळी 10.00 ते दुपारी 12.00 |
| Provisional गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | दुपारी 12.30 वा. |
| अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे | दुपारी 1.30 वा. |
| प्रथम वर्ष / थेट द्वितीय वर्ष प्रवेशास सुरुवात | दुपारी 2.00 वा. पासून पुढे |

**टीप : Provisional गुणवत्ता यादीमध्ये कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास दुपारी 1.00 वाजेपर्यंत कळवावा. अंतिम गुणवत्ता यादी प्रदर्शित झाल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या आक्षेपाची दखल घेतली जाणार नाही.**

## अतिरिक्त प्रवेश फेरीची नियमावली

१) संस्था स्तरावरील या फेरीमध्ये केवळ केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त असलेल्या व रिक्त होणाऱ्या जागाच भरण्यात येतील.

२) केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेदरम्यान राखीव असलेल्या जागा संबंधित प्रवर्गातील गुणवत्तेनुसार भरल्या जातील. त्यानंतरही जागा रिक्त राहिल्यास त्या गुणवत्तेनुसार सर्वांसाठी खुल्या करण्यात येतील.

३) प्रवेश निश्चित करताना संपूर्ण प्रवेश फी Online (ATM / Debit Card / UPI / G-Pay) द्वारे भरावी.

४) इतर संस्थेमध्ये प्रवेश घेतलेला असल्यास तेथील प्रवेश रद्द करण्याची ऑनलाइन कार्यवाही विद्यार्थ्यांनी स्वतः करावयाची असून त्याची जबाबदारी संस्थेची राहणार नाही.

५) प्रवेश निश्चित करताना संपूर्ण फी, सर्व मूळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतींचा एक संच सोबत आणावा.

६) विहित वेळेत नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांनी सर्व मूळ कागदपत्रांसह संस्थेत उपस्थित राहणे आवश्यक आहे.

७) ज्या विद्यार्थ्यांना जागा वाटप होईल त्यांनी त्याच दिवशी संबंधित विभागात प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.

---

स्थळ : विक्रमगड
दिनांक : ____________

**ही माहिती संबंधित विद्यार्थ्यांपर्यंत जास्तीत जास्त पोहोचवावी.**

Dondhe
प्राचार्य
**शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड**